महाराष्ट्र शासन
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
तळमजला, मध्यवर्ती कार्यालये, पुणे ४११००१

दूरध्वनी क्र.०२०-२६१२२०७६

Email: ddtpho_pune@rediffmail.com
ddtp.ho@maharashtra.gov.in

=====================================================================

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

सदरच्या जाहीर निवेदनाद्वारे सर्व उमेदवारांना कळविण्यात येते की, नगर रचना आणि मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ आरेखक, गट-क पदासाठी दिनांक १५.०९.२०२५ रोजी सकाळी ९.०० ते ११.०० या वेळेत राज्यातील नागपूर, मुंबई व पुणे अशा ०३ परीक्षा केंद्रावर ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे. सदरहू परीक्षेसाठी उमेदवारांनी कोणत्याही परिस्थितीत सकाळी ७.०० वाजेपर्यत परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे अनिवार्य आहे. तसेच, अनुरेखक, गट-क पदासाठी दिनांक १५.०९.२०२५ रोजी दुपारी २.०० ते ४.०० या वेळेत राज्यातील नागपूर, मुंबई व पुणे अशा ०३ परीक्षा केंद्रावर ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे. सदरहू परीक्षेसाठी उमेदवारांनी कोणत्याही परिस्थितीत दुपारी १२.०० वाजेपर्यत परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

यानुषंगाने सर्व उमेदवारांच्या निदर्शनास आणण्यात येते की, कनिष्ठ आरेखक, गट-क तसेच अनुरेखक, गट-क पदांच्या परीक्षेसंदर्भात जो अभिलेख आपणास आजपावेतो ऑनलाईन स्वरुपात उपलब्ध झाला आहे (उदा.जाहिरात, सर्वसाधारण सूचना इत्यादी) तसेच जो अभिलेख आपणास भविष्यात उपलब्ध होणार आहे. (उदा. प्रवेशपत्र, प्रश्नसंच इत्यादी) तो कनिष्ठ आरेखक, गट-क तसेच अनुरेखक, गट-क पदांच्या ऑनलाईन परीक्षेशी संबंधित असल्याचे सर्व उमेदवारांच्या अवलोकनार्थ प्रसिध्द करण्यात येत आहे.

( विजयकुमार ल. वाघमोडे )
सदस्य सचिव,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे.
तथा,
उपसंचालक,नगर रचना,
मुख्य कार्यालय, पुणे.

( जितेंद्र ल.भोपळे )
अध्यक्ष,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे.
तथा
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.